महाराष्ट्र विधानसभा

सत्यमेव जयते

# नरेन्द्र एल. मेहता

आमदार, मिरा-भाईंदर

जा.क्र.मंत्रालय/२९१/११/२०२५

दिनांक :- ०३/११/२०२५

प्रति,

मा.ना. श्री देवेंद्र फडणवीस साहेब,

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,

मंत्रालय, मुंबई.

मुख्यमंत्री सचिवालय
दिनांक 06/11/25
ई. ऑफिस क्र. 9275845

विषय :- मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र.२६२ टाऊनपार्क "वर्धमान डेवल्पर्स" या विकासकास BOT तत्वावर दिलेली निविदा महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करुन, मनमानी कारभार करुन दिनांक २३/०७/२०२५ रोजी केलेला प्रशासकीय ठराव रद्द करुन संबंधीत प्रकरणी उच्च स्तरीय चौकशी पुर्ण होईपर्यंत सदर प्रकरणी तात्काळ स्थगिती देणेबाबत.

महोदय

उपरोक्त विषयी आपणांस कळवू इच्छितो की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत आ.क्र.२६२ टाऊनपार्क करीता आरक्षित असुन सदरील आरक्षण बांधा,वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर वर्धमान डेवल्पर्स या विकासकास मा.महासभा दि. १८/०५/२००६ च्या ठराव क्र.२१ अन्वये ३० वर्ष वापरण्याकरीता मंजुरी दिली होती.

सदर ठरावानुसार एकूण ४४८००.००चौ.मी. पैकी ३८०८०.०० "A" भुखंड व ६७२०.००चौ.मी "B" भुखंड असे विभागणी करून भुखंड "A" मध्ये खाजगी वापर वर भुखंड "B" हे विकसित करुन शहरातील नागरिकांसाठी नाममात्र रु "२" इतके दर आकारून प्रवेश देणे या अटींवर देण्यात आले होते. परंतू मंजुर ठरावानुसार विकासकाने नियमांचे उल्लंघन करून "B" या भुखंडात मोठ्या प्रमाणावर अनाधिकृत बांधकाम करुन त्याचा देखिल वाणिज्य वापर केला होता. तसेच सदर भुखंडास विना परवानगी राईडस,व्हिडीओ गेम्स, रेस्टॉरंट व अन्य इतर खाजगी वापरासाठी करण्यात येत असल्याने तत्कालीन मा. महासभेने दि.०१/०३/२०१४ रोजी ठराव घेऊन सदर ठेका रद्द करण्याचा निर्णय घेतला होता.

याबाबत संबंधित विकासकाने महापालिकेशी वाद निर्माण झाल्यामुळे मा. लवादाची मागणी केल्याने सदर प्रकरण एक सदस्यित लवादाकडे सुरु होता. यामध्ये मा. लवादाने समझोता करण्याचे आदेश दिले होते.

कार्यालय : सेवन इलेवन हेवन, सेवन स्क्वेअर ॲकॅडमी के पास, मिरा-भाईंदर रोड, मिरा रोड (पुर्व), जि. ठाणे - 401 107.
फोन : 2810 5050 • ई-मेल : narendramehta711@gmail.com • वेबसाईट : www.bjpmirabhayandar.com

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र विधानसभा

सत्यमेव जयते

नरेन्द्र एल. मेहता
आमदार, मिरा-भाईंदर

महापालिकेने मा.लवादाकडे योग्य ती बाजू न मांडता सदर विकासकाशी आर्थिक संगनमत करून सदर प्रकरणी विकासकाचा फायदा होईल अशी भुमिका घेतली.

तसेच या प्रकरणी नियमांचे उल्लंघन होऊन अनाधिकृत बांधकाम करून शहरातील जनतेची महापालिकेची फसवणूक करून सुद्धा महापालिका प्रशासनाने सदर ठेका रद्द करण्याऐवजी उलटपक्षी विकासकाच्या हिताचा विचार करून दि.२३/०७/२०२५ रोजी प्रशासकीय ठराव क्र.१६५ अन्वये अजुन ३० वर्षाचा कालावधी वाढवून देण्याचा मनमानी कारभार केला आहे.

तरी मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र..२६२ टाऊनपार्क "वर्धमान डेवल्पर्स" या विकासकास BOT तत्वावर दिलेली निविदा महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करुन, मनमानी कारभार करून देणेकरता दिनांक २३/०७/२०२५ रोजी केलेला प्रशासकीय ठराव रद्द करून संबंधीत प्रकरणी उच्च स्तरीय चौकशी पुर्ण होईपर्यंत सदर प्रकरणी तात्काळ स्थगिती देणेबाबत संबंधितांना आदेशित करावे, ही विनंती.

आपला,

(नरेंद्र एल. मेहता)

कार्यालय : सेवन इलेवन मॅशन, सेवन स्क्वेयर एकेडमी के पास, मिरा-भाईंदर रोड, मिरा रोड (पुर्व), जि. थाने - 401 107.
फोन : 2810 5050 • ई-मेल : narendramehta711@gmail.com • वेबसाईट : www.bjpmirabhayandar.com